# पोलीस आयुक्त कार्यालय, औरंगाबाद शहर

मिल कॉर्नर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, औरंगाबाद - ४३१ ००१

दुरध्वनी क्रमांक :- ०२४०-२२४०५९१, फॅक्स क्र. ०२४०-२२४०५९६

ईमेल - cp.aurangabad@mahapolice.gov.in


जा.क्र. कक्ष-१०/पोशि ते सफौ/ज्येष्ठता सुची/१-१-२१/२०२१/ २५०३ औरंगाबाद, दिनांक ३ /०३/२०२१

विषय :- पोलीस शिपाई (पोलीस शिपाई चालकासह) ते सहा.पोलीस उपनिरीक्षक यांची दि.०१/०१/२०२१ रोजीची पदनिहाय ज्येष्ठता सुची, प्रसिध्द केले बाबत.

--००--

महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली,१९८२ व या नियमावलीतील दिनांक २३/०९/१९८८ च्या अधिसुचने द्वारे केलेल्या सुधारणा लक्षात घेवून औरंगाबाद शहर पोलीस दलाचे आस्थापनेवरील पोलीस शिपाई (पोलीस शिपाई चालकासह) ते सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पदावरील पोलीस कर्मचा-यांच्या दिनांक ०१/०१/२०२१ रोजीच्या पद निहाय ज्येष्ठता सुची या कार्यालयाचे aurangabadcitypolice.gov.in या संगणक संकेतस्थळावर वरील सदंर्भीय पत्रान्वये प्रसिध्द करण्यात आली होती. परंतु सदर ज्येष्ठतासुचीमध्ये संगणकातील तांत्रिक अडचणीमुळे बरचशा पोलीस कर्मचाऱ्यांचे जन्म दिनांक, भरती दिनांक व पदोन्नती दिनांकामध्ये पिडीएफ फाईल तयार करतांना बदल झाल्याचे निर्देशनास आल्याने, पुन्हा सुधारीत पिडीएफ फाईल तयार करुन ज्येष्ठतासुची प्रसिध्द करण्यात येत आहे.

तरी सर्व संबंधित अधिकारी, पोलीस ठाणे/शाखा प्रभारी अधिकारी यांनी सदरच्या ज्येष्ठता सुची डाऊनलोड करुन घेवून त्यांचे अधिपत्याखालील सर्व पोलीस कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणुन द्यावी व संबंधित कर्मचा-यांची स्वाक्षरी ज्येष्ठता सूचीवर घेवून अभिलेखावर ठेवावी.

तसेच ज्येष्ठता सुची मध्ये नमुद कर्मचा-यांचे नांव, जात, जात प्रवर्ग, जन्म दिनांक, भरती दिनांक तसेच नमुद करण्यात आलेला पदोन्नती दिनांक इत्यादी बाबत काही तफावत/उणिवा असल्यास त्याबाबत पुराव्यासह संबंधित पोलीस कर्मचा-यांचे सविस्तर अर्ज दिनांक १२/०३/२०२१ पावेतो या कार्यालयास सादर करणे बाबत सर्व पोलीस कर्मचा-यांना सुचना देण्यात याव्यात. मुदती नंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही याचीही सर्व कर्मचाऱ्यांना समज द्यावी.

३.३

(निकेश खाटमोडे पाटील)
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय)
औरंगाबाद शहर

प्रति,

१. सर्व पोलीस ठाणे/शाखा प्रभारी अधिकारी, औरंगाबाद शहर.
२. राखीव पोलीस निरीक्षक, पोमु, औरंगाबाद शहर.

प्रत :- १. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, व परिमंडळ २ औरंगाबाद शहर.
२... सर्व सहा. पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर.

प्रत :- १. पोलीस अधीक्षक, दहशतवाद विरोधी पथक, म.रा.मुंबई.
२. पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद.
३. पोलीस अधीक्षक (प्रशासन), विशेष सुरक्षा विभाग, दादर , मुंबई
४. प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना.
५. पोलीस अधीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग, औरंगाबाद.
६. अपर उप आयुक्त, राज्य गुप्त वार्ता विभाग, औरंगाबाद.
७. पोलीस अधीक्षक, नागरी हक्क संरक्षण, औरंगाबाद.
८. सह आयुक्त तथा उपाध्यक्षक, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.

प्रत :- पोलीस निरीक्षक, सायबर सेल, औरंगाबाद शहर

२/- सोबत या आस्थापनेवरील पोलीस शिपाई (पोलीस शिपाई चालकासह) ते सहायक पोलीस उप निरीक्षक यांची ०१/०१/२०२१ ची जेष्ठता सुची पाठविण्यात येत आहे.सदरची जेष्ठता सुची या आस्थानेच्या वेबसाईटवर प्रसिध्द करुन अनुपालन अहवाल सादर करावा.